# माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेचा भावनिक क्षमता आणि समायोजनाच्या संदर्भात अभ्यास


**संशोधक**

माळी तुषार मधुकर

M.A., M.Ed., NET (Education)

**मार्गदर्शक**

**प्राचार्य, डॉ. डी.ए.सूर्यवंशी**

(M.A.M.Ed.Ph.D. PGDTE)

एस.ई.एस.संचलित, आर.सी.पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय,

शिरपूर, जि.धुळे.



**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव**

**२०१५**

**समस्या विधान**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने समस्या विधान प्रश्न स्वरूपात मांडले होते, ते प्रश्न पुढीलप्रमाणे -

१. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेत फरक आहे का?

२. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या भावनिक क्षमतेत फरक आहे का?

३. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या समायोजनात फरक आहे का?

४. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यात सहसंबंध आहे का?

५. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांचे समायोजन व अध्यापक परिणामकारकता यात सहसंबंध आहे का?

**संशोधनाची उद्दीष्टे**

१. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

२. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या भावनिक क्षमतेचा अभ्यास करणे.

३. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या समायोजनाचा अभ्यास करणे.

४. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

५. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकाच्या भावनिक क्षमतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

६. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या समायोजनाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

७. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यांचा सहसंबंधाचा अभ्यास करणे.

८. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांचे समायोजन व अध्यापक परिणामकारकता यांचा सहसंबंधाचा अभ्यास करणे.

**परिकल्पना**

१. माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरुष शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

SES R. C. Patel College of Education, Shirpur

२. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेचा मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

३. ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

४. शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

५. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या अध्यापक परिणामकारकतेचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

६. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

७. माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या भावनिक क्षमतेचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

८. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या भावनिक क्षमतेचा मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

९. ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या भावनिक क्षमतेचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

१०. शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरुष शिक्षकांच्या भावनिक क्षमतेचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

११. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या भावनिक क्षमतेचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

१२. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांच्या भावनिक क्षमतेचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

१३. माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या समायोजनाचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

१४. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या समायोजनाचा मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

१५. ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरुष शिक्षकांच्या समायोजनाचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

SES R. C. Patel College of Education, Shirpur

१६. शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांच्या समायोजनाचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

१७. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या समायोजनाचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

१८. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांच्या समायोजनाचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

१९. माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

२०. माध्यमिक शाळेतील शिक्षकांचे समायोजन व अध्यापक परिणामकारकता यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

२१. ग्रामीण माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

२२. ग्रामीण माध्यमिक शाळेतील शिक्षकांचे समायोजन व अध्यापक परिणामकारकता यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

२३. ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

२४. ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षकांचे समायोजन व अध्यापकपरिणामकारकता यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

२५. ग्रामीण माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

२६. ग्रामीण माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांचे समायोजन व अध्यापक परिणामकारकता यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

२७. शहरी माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

२८. शहरी माध्यमिक शाळेतील शिक्षकांचे समायोजन व अध्यापक परिणामकारकता यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

२९. शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

SES R. C. Patel College of Education, Shirpur

३०. शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षकांचे समायोजन व अध्यापक परिणामकारकता यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

३१. शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

३२. शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांचे समायोजन व अध्यापक परिणामकारकता यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

**संशोधनाच्या पद्धती-** वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षणात्मक-सहसंबंधात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे. संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीच्या सर्व पायऱ्याचा अवलंब केला आहे.

**जनसंख्या-** प्रस्तुत संशोधनात संशोधकाने धुळे जिल्हयातील धुळे, शिरपूर, शिंदखेडा व साक्री तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील ३४० माध्यमिक शाळांमधील १३३०८ शिक्षकांची संशोधनाची जनसंख्या म्हणून निश्चिती करण्यात आली होती. **न्यादर्श-** धुळे जिल्हयातील ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील शिक्षकांची (स्त्री व पुरूष) एकूण १३३०८ जनसंख्येतुन ५% म्हणजे ६६६ (ग्रामीण व शहरी भागांतील शाळांमधुन अनुक्रमे ५०१ व १६५ स्त्री व पुरूष शिक्षक) शिक्षकांची न्यादर्श म्हणुन स्तरीत यादृच्छिक नमूना निवड पद्धतीने निवड करण्यात आली.

**संशोधनाची साधने**

१. **स्वनिर्मित अध्यापक परिणामकारकता शोधिका (Teacher Effectiveness Inventory) –** प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळेतील शिक्षकांची अध्यापक परिणामकारकतेचे मापन करण्यासाठी संशोधकाने स्वनिर्मित 'अध्यापक परिणामकारकता शोधिकेचा' (Teacher Effectiveness Inventory) अवलंब केला आहे. यात एकूण ५० विधाने आहेत.

२. **भावनिक क्षमता मापिका-** प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भावनिक क्षमता मापन करण्यासाठी शर्मा एच.सी. आणि भारद्वाज आर. यांची प्रमाणित 'Emotional Competencies Scale' (Revised Scale) या भावनिक क्षमता मापिकेचा अवलंब करण्यात आला. ही एक वस्तुनिष्ठ मापन कसोटी आहे. या चाचणीत एकूण ३० विधाने आहेत.

३. **शिक्षक समायोजन शोधिका-** प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळेतील शिक्षकांचे समायोजन मापन करण्यासाठी डॉ. एस. के. मंगल यांच्या प्रमाणित 'Mangal's Teacher Adjustment Inventory' (MTAI)' (Short Form) या शिक्षक समायोजन शोधिकेचा अवलंब करण्यात आला. या शोधिकेत एकूण ७० प्रश्न आहेत.

SES R. C. Patel College of Education, Shirpur

**संख्याशास्त्रीय परिमाणे-** प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेचा भावनिक क्षमता व समायोजन यांचा संदर्भात प्राप्त माहितीचे विश्लेषण करणसाठी व अन्वयार्थ लावण्यासाठी टक्केवारी, मध्यमान, प्रमाणविचलन, मध्यमान फरकाची प्रमाणत्रूटी, 't' मूल्य, व पिअरसनचा सहसंबंध गुणक ('r') या संख्याशास्त्रीय परिमाणाचा उपयोग केला आहे.

**निष्कर्ष**

१. माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांचे अध्यापक परिणामकारकतेचा मध्यमान गुणांक (१६८.२१) हा पुरूष शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेच्या मध्यमान गुणांकापेक्षा (१६२.७३) अधिक आहे. यावरून माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिका या पुरूष शिक्षकांपेक्षा अध्यापक म्हणून अधिक परिणामकारक दिसून येतात.

२. शहरी माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेचा मध्यमान गुणांक (१६७.४९) हा ग्रामीण माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेच्या मध्यमान गुणांकापेक्षा (१६३.७३) अधिक आहे. यावरून शहरी माध्यमिक शाळेतील शिक्षक हे ग्रामीण माध्यमिक शाळेतील शिक्षकांपेक्षा अध्यापक म्हणून अधिक परिणामकारक दिसून येतात.

३. ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या अध्यापक परिणामकारकतेचे मध्यमान गुणांक (१६६.७८) हा ग्रामीण माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेच्या मध्यमान गुणांकापेक्षा (१६२.२४) अधिक आहे. यावरून ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिका ग्रामीण माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांपेक्षा अध्यापक म्हणून अधिक परिणामकारक दिसून येतात.

४. शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या अध्यापक परिणामकारकतेचा मध्यमान गुणांक (१७१.५२) हा शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेच्या मध्यमान गुणाकांपेक्षा (१६४.४५) अधिक आहे. यावरून शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिका शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांपेक्षा अध्यापक म्हणून अधिक परिणामकारक दिसून येतात.

५. शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या अध्यापक परिणामकारकतेचा मध्यमान गुणांक (१७१.५२) हा ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या अध्यापक परिणामकारकतेच्या मध्यमान गुणांकापेक्षा (१६६.७८) अधिक आहे. यावरून शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिका ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांपेक्षा अध्यापक म्हणून अधिक परिणामकारक दिसून येतात.

SES R. C. Patel College of Education, Shirpur

६. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांच्या अध्यापक परिणामकारकतेचा मध्यमान गुणाकांत सार्थक फरक नाही. यावरून ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील शिक्षक हे जवळपास अध्यापक म्हणून सारखेच परिणामकारक दिसून येतात.

७. माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या भावनिक क्षमतेचा मध्यमान गुणांक (२९५.८३) हा पुरूष शिक्षकांच्या भावनिक क्षमतेचा मध्यमान गुणांकापेक्षा (२८७.६१) अधिक आहे. यावरून माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या भावनिक क्षमता ही पुरूष शिक्षकांच्या भावनिक क्षमतेपेक्षा अधिक दिसून येते.

८. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या भावनिक क्षमतेचा मध्यमान गुणाकांत सार्थक फरक नाही. यावरून ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भवनिक क्षमता ही सारखी दिसून येते.

९. ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या भावनिक क्षमतेचा मध्यमान गुणांक (२९४.८४) हा ग्रामीण माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांची भावनिक क्षमतेचा मध्यमान गुणांकापेक्षा (२८७.०१) अधिक आहे. यावरून ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या भावनिक क्षमता ही ग्रामीण माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांपेक्षाअधिक दिसून येते.

१०. शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या भावनिक क्षमतेचा मध्यमान गुणांक (२९८.११) हा शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांच्या भावनिक क्षमतेचा मध्यमान गुणाकांपेक्षा (२८९.७९) अधिक आहे. यावरून शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या भावनिक क्षमता ही शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकाच्या भावनिक क्षमतेपेक्षा अधिक दिसून येते.

११. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या भावनिक क्षमतेचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक नाही. यावरून शहरी व ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांची भावनिक क्षमता सारखी दिसून येते.

१२. ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांच्या भावनिक क्षमतेचा मध्यमान गुणाकांत सार्थक फरक नाही. यावरून ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांची भावनिक क्षमता जवळपास सारखी दिसून येते.

१३. माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या समायोजनाचा मध्यमान गुणांक (५६.२५) हा पुरूष शिक्षकांच्या समायोजनाचा मध्यमान गुणांकापेक्षा (५१.१२) अधिक आहे. यावरून माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांचे समायोजन हे पुरूष शिक्षकांच्या समायोजनापेक्षा तुलनेने अधिक आहे.

SES R. C. Patel College of Education, Shirpur

१४. शहरी माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या समायोजनाचा मध्यमान गुणांक (५६.२१) हा ग्रामीण माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या समायोजनाचा मध्यमान गुणांकापेक्षा (५१.८५) अधिक आहे. यावरून शहरी माध्यमिक शाळेतील शिक्षकांचे समायोजन हे ग्रामीण माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या समायोजनापेक्षा तुलनेने अधिक आहे.

१५. ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या समायोजनाचा मध्यमान गुणांक (५५.२३) हा ग्रामीण माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांच्या समायेजनाचा मध्यमान गुणांकापेक्षा (५०.२०) अधिक आहे. यावरून ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांचे समायोजन हे ग्रामीण माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांच्या समायोजनापेक्षा तुलनेने अधिक आहे.

१६. शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या समायोजनाचा मध्यमान गुणांक (५८.५९) हा शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांच्या समायोजनाचा मध्यमान गुणाकांपेक्षा (५४.४१) अधिक आहे. यावरून शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांचे समायोजन हे शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकाच्या समायोजनापेक्षा तुलनेने अधिक आहे.

१७. शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या समायोजनाचा मध्यमान गुणांक (५८.५९) हा ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या समायोजनाचा मध्यमान गुणांकापेक्षा (५५.२३) अधिक आहे. यावरून शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या समायोजन हे ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांच्या समायोजनापेक्षा तुलनेने अधिक आहे.

१८. शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांच्या समायोजनाचा मध्यमान गुणांक (५४.४१) हा ग्रामीण माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांच्या समायोजनाचा मध्यमान गुणाकांपेक्षा (५०.२०) अधिक आहे. यावरून शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांचे समायोजन हे ग्रामीण माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांच्या समायोजनापेक्षा तुलनेने अधिक आहे.

१९. माध्यमिक शाळेतील (स्त्री व पुरूष) शाळेतील शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यांत धन सहसंबंध आहे. तसेच प्राप्त 'r' मूल्य ०.७९८ आहे म्हणजे माध्यमिक शाळेतील (स्त्री व पुरूष) शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यांतील सहसंबंध उच्चप्रतीचा आहे.

२०. माध्यमिक शाळेतील (स्त्री व पुरूष) शिक्षकांचे समायोजन व अध्यापक परिणामकारकता यांत धन सहसंबंध आहे. तसेच प्राप्त ‘r’ मूल्य ०.७६२ आहे म्हणजे माध्यमिक शाळेतील (स्त्री व पुरूष) शिक्षकांचे समायोजन व अध्यापक परिणामकारकता यांतील सहसंबंध उत्तमप्रतीचा आहे.

SES R. C. Patel College of Education, Shirpur

२१. ग्रामीण माध्यमिक शाळेतील (स्त्री व पुरूष) माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यांत धन सहसंबंध आहे. तसेच प्राप्त 'r' मूल्य ०.६५४ आहे म्हणजे माध्यमिक शाळेतील (स्त्री व पुरूष) माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यांतील सहसंबंध चांगला आहे.

२२. ग्रामीण माध्यमिक शाळेतील (स्त्री व पुरूष) शिक्षकांचे समायोजन व अध्यापक परिणामकारकता यांत धन सहसंबंध आहे. तसेच प्राप्त 'r' मूल्य ०.६९९ आहे म्हणजे माध्यमिक शाळेतील (स्त्री व पुरूष) शिक्षकांचे समायोजन व अध्यापक परिणामकारकता यांतील सहसंबंध चांगला (मध्यम प्रतीचा) आहे.

२३. ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यांत धन सहसंबंध आहे. तसेच प्राप्त 'r' मूल्य ०.६४५ आहे. म्हणजे ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यांतील सहसंबंध चांगला आहे.

२४. ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षकांचे समयोजन व अध्यापक परिणामकारकता यांत धन सहसंबंध आहे. तसेच प्राप्त 'r' मूल्य ०.५६२ आहे. म्हणजे ग्रामीण माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षकांचे समयोजन व अध्यापक परिणामकारकता यांतील सहसंबंध चांगला (मध्यम प्रतीचा) आहे.

२५. ग्रामीण माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यांत धन सहसंबंध आहे. तसेच प्राप्त 'r' मूल्य ०.७२२ आहे. म्हणजे पुरूष शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यांतील सहसंबंध उत्तम प्रतीचा आहे.

२६. ग्रामीण माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांचे समायोजन व अध्यापक परिणामकारकता यांत धन सहसंबंध आहे. तसेच प्राप्त 'r' मूल्य ०.६०८ आहे. म्हणजे पुरूष शिक्षकांचे समायोजन व अध्यापक परिणामकारकता यांतील सहसंबंध चांगला आहे.

२७. शहरी माध्यमिक शाळेतील (स्त्री व पुरूष) शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यांत धन सहसंबंध आहे. तसेच प्राप्त 'r' मूल्य ०.७५४ आहे म्हणजे शहरी माध्यमिक शाळेतील (स्त्री व पुरूष) शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यांतील सहसंबंध उत्तम प्रतीचा आहे.

२८. शहरी माध्यमिक शाळेतील (स्त्री व पुरूष) शिक्षकांचे समायोजन व अध्यापक परिणामकारकता यांत धन सहसंबंध आहे. तसेच प्राप्त 'r' मूल्य ०.७४४ आहे. म्हणजे शहरी माध्यमिक शाळेतील

SES R. C. Patel College of Education, Shirpur

(स्त्री व पुरूष) शिक्षकांची अध्यापक परिणामकारकता व समायोजन यांतील सहसंबंध उत्तमप्रतीचा आहे.

२९. शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यांत धन सहसंबंध आहे. तसेच प्राप्त 'r' मूल्य ०.७७७ आहे. म्हणजे शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यांतील सहसंबंध उच्चप्रतीचा आहे.

३०. शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षकांचे समायोजन व अध्यापक परिणामकारकता यांत धन सहसंबंध आहे. तसेच प्राप्त 'r' मूल्य ०.७०५ आहे. म्हणजे शहरी माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षकांचे समायोजन व अध्यापक परिणामकारकता यांतील सहसंबंध उच्च प्रतीचा आहे.

३१. शहरी शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यांत धन सहसंबंध आहे. तसेच प्राप्त 'r' मूल्य ०.८८५ आहे. म्हणजे शहरी शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांची भावनिक क्षमता व अध्यापक परिणामकारकता यांतील सहसंबंध उच्चप्रतीचा आहे.

३२. शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांचे समायोजन व अध्यापक परिणामकारकता यांत धन सहसंबंध आहे. तसेच प्राप्त 'r' मूल्य ०.७६६ आहे. म्हणजे शहरी माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांचे समायोजन व अध्यापक परिणामकारकता यांतील सहसंबंध उच्च प्रतीचा आहे.

SES R. C. Patel College of Education, Shirpur